ePaper

**हाकेंचा ताफा जरांगेंच्या गावात पोहोचताच दगडफेक, गावात तणावपूर्ण शांतता!**



॥ वर्ष - 7 । अंक - 357 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- कपिलचा टीमला महत्त्वाचा सल्ला
- द्रविडने निराश विराटला दिला धीर
- संसदेत सेंगोल नको, संविधान हवं
- गल्लीतील कार्यकर्ते पवारांवर बोलतात


www.mahaenews.com ॥ शुक्रवार, दिनांक 28 जून 2024 ॥ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## रामकृष्ण हरी! तुकोबांच्या पालखीचे आज प्रस्थान

# अवघे देहू भक्तीमय!

। पिंपरी । महाईन्यूज

**आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज, शुक्रवारी (२८ जून) देहूतून प्रस्थान होणार आहे. या निमित्ताने अवघे देहू भक्तीमय झाले असून, इंद्रायणी नदीकाठी भाविकांची गर्दी होऊ लागली आहे.**



### सुविधांची तयारी पूर्ण

श्री. क्षेत्र देहू ते पंढरपूर आषाढी वारीचा ३३९वा पालखी सोहळा २८ जून ते १७ जुलै कालावधीत साजरा होत आहे. त्या अनुषंगाने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू नगरपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या वतीने सोयीसुविधांची तयारी पूर्ण झाली आहे. सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यांतून भाविक देहूमध्ये दाखल होऊ लागले आहेत. मुख्य मंदिरासह संत तुकाराम महाराज मंदिर, पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिर या ठिकाणी फुलांची सजावट, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

### कार्यक्रम रूपरेषा

पहाटे ४.३० महापूजा
सकाळी ५ ते ७ काकडा
८ ते ९ गाथा भजन
१० ते दुपारी १२ काल्याचे कीर्तन
दुपारी १२ ते १ जरीपटका सन्मान
१ ते २ पादुका पूजन व सत्कार
दुपारी २ पालखी प्रस्थान
सायंकाळी ६ पालखी मुक्काम
रात्री ९ ते ११ कीर्तन, जागर

### आवश्यक तिथे सीसीटीव्ही

इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. वारकऱ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. गावात ठिकठिकाणी जंतुनाशक फवारणी करण्यात आली आहे. मंदिरात आरोग्य पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. आवश्यक ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

### भोजनाची सोय

संस्थानने पालखी प्रस्थान सोहळ्याची रूपरेषा जाहीर केली आहे. मुख्य मंदिरात सकाळपासूनच दिंड्यांना प्रवेश दिला जाणार आहे. मानाचे अश्व सज्ज असून, पालखी आणि रथाची सजावट करण्यात आली आहे. येणाऱ्या भाविकांसाठी संत तुकाराम अन्नदान मंडळाने भोजनाची सोय केली आहे. त्यासाठी अनेकांनी मदतीचा हात दिला आहे.

## इंद्रायणीकाठी वारकऱ्यांची मांदियाळी, सोयीसुविधांची तयारी पूर्ण

### 'निर्मल वारी'चा संकल्प

संस्थान आणि नगरपंचायत यांच्या वतीने यंदाही 'निर्मल वारी'चा संकल्प करण्यात आला आहे. त्यासाठी स्वच्छतेच्या अनुषंगाने पथकांची स्थापना करण्यात आली आहे. जवळपास ५०हून अधिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने इंद्रायणी नदीघाट, देऊळवाडा या ठिकाणी स्वच्छता केली जात आहे. गावात ठिकठिकाणी एक हजारांहून अधिक स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आले असून, भाविकांसाठी २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## मोहोळ यांनी संरक्षण मंत्र्यांची भेट घेताच २४ तासांत

# पुणेकरांच्या हवाई प्रवासातील अडथळा तातडीने दूर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे विमानतळाच्या 'पार्किंग बे'वर गेल्या दीड महिन्यांपासून उभे असलेले एअर इंडियाचे अपघातग्रस्त विमान अखेर गुरूवारी संरक्षण दलाच्या जागेत हलवण्यात आले. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतल्यानंतर २४ तासांतच हे विमान संरक्षण खात्याच्या जागेत हलविण्याची परवानगी मिळाली. या विमानाला हलविल्यामुळे पुणे विमानतळावरील ये-जा करणाऱ्या विमानांचा विलंब टळणार आहे. यामुळे पुणेकरांच्या हवाई प्रवासातील मोठा अडथळा दूर झाला आहे.**




पुणे विमानतळाच्या 'पार्किंग बे'वर एअर इंडियाचे अपघातग्रस्त विमान उभे असल्याने त्याचा ताण इतर विमानांच्या वाहतुकीवर झाला होता. शिवाय ही 'पार्किंग बे' वापरात नसल्यामुळे विमानांचे वेळापत्रक कोलमडले होते. या विमानाच्या दुरुस्तीसाठी आणखी काही काळ लागण्याची शक्यता असल्याने ते तात्पुरत्या स्वरुपात संरक्षण दलाच्या जागेवर हलविण्याचा पर्याय उपलब्ध होता. या पार्श्वभूमीवर अपघातग्रस्त विमान संरक्षण दलाच्या जागेत हलविण्याबाबत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्याशी केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांची चर्चा झाली होती.

### वाणिज्य शाखेसाठी 465 गुण आवश्यक

तर यंदा कला शाखेसाठी ४७२, वाणिज्य शाखेसाठी ४६५ गुण आवश्यक आहेत. दरम्यान पात्रतागुण वाढणे, कमी होणे यामागे निश्चित असा काही तर्क नाही. कारण विद्यार्थ्यांना मिळालेले गुण, त्यांनी नोंदवलेले पसंतीक्रम, त्यांच्या पसंतीनुसार उपलब्ध असलेल्या जागा असे विविध घटक पात्रतागुण निश्चित होण्यासाठी कारणीभूत ठरतात, असे सिम्बायोसिस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हृषिकेश सोमण यांनी सांगितले.प्रवेश प्रक्रियेत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. प्रवेश न घेतल्यास संबंधित विद्यार्थी पुढील दोन फेऱ्यांसाठी पात्र राहणार नाही.

# देहूत पोलिसांची करडी नजर!

## पालखी सोहळ्यात चोरट्यांवर असणार विशेष लक्ष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३३९ वा पालखी सोहळा उद्या पार पडत आहे. या निमित्ताने पिंपरी-चिंचवड पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार आहे. पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी देहू आणि आळंदीत संस्थानाला भेट दिली. तुकोबा आणि माऊलींच दर्शन देखील घेतलं. सुरक्षेबाबत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. याबाबत त्यांनी स्वतः जाऊन पाहणी केली.**



देहूत उद्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी देहूत दाखल होत असतात. उद्याही वारकऱ्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देहूत मोठा पोलिसांचा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे. आज पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी स्वतः देहूत जाऊन सुरक्षेबाबत आढावा घेतला. देवस्थानच्या विश्वस्तांची संवाद साधला. यावेळी अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, माधुरी कांगणे, बापू बांगर, डॉ. शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे, सचिन हिरे राजेंद्रसिंग गौर, देविदास देवारे आदी उपस्थित होते.दरवर्षी देहू आणि आळंदीत पालखी सोहळ्यात चोरटे सक्रिय असतात. ग्रामीण भागातून आलेल्या वारकऱ्यांना याचा फटका बसू शकतो, हे लक्षात घेऊन देहू आणि आळंदीत ठिकठिकाणी सीसीटीव्ही तसेच पोलीस हे वारकऱ्यांच्या वेशभूषेत, खाकी गर्दीत फिरणार आहेत. यामुळे चोरीच प्रमाण कमी होऊ शकतं. पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांचं रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर वॉचर बनून नजर ठेवणार आहेत. चोरट्यांची नजर ही भाविकांच्या मोबाईल, रोख रक्कम, दागिन्यांवर असते. त्यामुळे वारकऱ्यांनी आणि भाविकांनी सतत सतर्क राहण्याची गरज आहे.देहूत उद्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी देहूत दाखल होत असतात. उद्याही वारकऱ्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देहूत मोठा पोलिसांचा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे. आज पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी स्वतः देहूत जाऊन सुरक्षेबाबत आढावा घेतला. देवस्थानच्या विश्वस्तांची संवाद साधला..दरवर्षी देहू आणि आळंदीत पालखी सोहळ्यात चोरटे सक्रिय असतात. ग्रामीण भागातून आलेल्या वारकऱ्यांना याचा फटका बसू शकतो.

### पालखी सोहळा उद्या पार पडत आहे

हे लक्षात घेऊन देहू आणि आळंदीत ठिकठिकाणी सीसीटीव्ही तसेच पोलीस हे वारकऱ्यांच्या वेशभूषेत, खाकी गर्दीत फिरणार आहेत. यामुळे चोरीच प्रमाण कमी होऊ शकतं. पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांचं रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर वॉचर बनून नजर ठेवणार आहेत. चोरट्यांची नजर ही भाविकांच्या मोबाईल, रोख रक्कम, दागिन्यांवर असते. त्यामुळे वारकऱ्यांनी आणि भाविकांनी सतत सतर्क राहण्याची गरज आहे.जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३३९ वा पालखी सोहळा उद्या पार पडत आहे.

# अकरावी प्रवेशांसाठी यंदा कटऑफ किती?

## विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी १ जुलैपर्यंतची मुदत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत अकरावीच्या प्रवेशासाठीची पहिल्या फेरीत ३८ हजार ८९० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला.**

प्रवेश निश्चित करण्यासाठी १ जुलैपर्यंतची मुदत आहे. दरम्यान, यंदा प्रवेशासाठीचे पात्रता गुण नव्वदीपारच आहेत. त्यातही कला आणि वाणिज्य शाखेच्या पात्रता गुणांमध्ये वाढ, तर विज्ञान शाखेसाठी काही ठिकाणी वाढ आणि काही ठिकाणी घट झाल्याचे चित्र आहे.शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार पहिल्या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत ३४३ महाविद्यालयांमध्ये १ लाख २० हजार २६५ जागा उपलब्ध आहेत. त्यातील ९३ हजार ३५६ जागा केंद्रीय प्रवेशांसाठी (कॅप), तर २६ हजार ९०९ जागा कोटा प्रवेशांसाठी आहेत. केंद्रीय प्रवेशांसाठी ७० हजार २८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. पहिल्या फेरीत वाणिज्य शाखेत १४ हजार २११, कला शाखेत ३ हजार ६४०, विज्ञान शाखेत २० हजार ६०४, तर व्यवसाय अभ्यासक्रमासाठी ४३५ अशा एकूण ३८ हजार ८९० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे.



नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी चढाओढ असते. त्यामुळे पात्रता गुणांचा टक्का महत्त्वाचा ठरतो. यंदा फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेसाठी ४४४, तर विज्ञान शाखेसाठी ४७४ गुण आवश्यक ठरले. गेल्यावर्षी ४२९ आणि ४७५ गुण आवश्यक होते. बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात यंदा ४७६, तर गेल्यावर्षी ४७९ गुण आवश्यक होते. डॉ. शामराव कलमाडी महाविद्यालयात यंदा कला शाखेसाठी ४५२, वाणिज्य शाखेसाठी ४४९, विज्ञान शाखेसाठी ४६८ गुण आवश्यक राहिले. गेल्यावर्षी कला शाखेसाठी ४३९, वाणिज्य शाखेसाठी ४१८, विज्ञान शाखेसाठी ४५८ गुणांवर प्रवेश मिळाला होता. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या कला, विज्ञान शाखेच्या पात्रता गुणांमध्ये गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा फरक पडलेला नाही. यंदा कला शाखेसाठी ३३०, विज्ञान शाखेसाठी ४५४ गुण आहेत. मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर येथे यंदा कला शाखेसाठी ३४३, वाणिज्य शाखेसाठी ४४०, विज्ञान शाखेसाठी ४५४ गुण आवश्यक ठरले. तर गेल्यावर्षी कला शाखेसाठी ३४३, वाणिज्य शाखेसाठी ४४६, विज्ञान शाखेसाठी ४६० गुण आवश्यक होते. सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेत गेल्यावर्षी ४१५, वाणिज्य शाखेत ४३१ गुण होते.

### वाणिज्य शाखेसाठी 465 गुण आवश्यक

तर यंदा कला शाखेसाठी ४७२, वाणिज्य शाखेसाठी ४६५ गुण आवश्यक आहेत. दरम्यान पात्रतागुण वाढणे, कमी होणे यामागे निश्चित असा काही तर्क नाही. कारण विद्यार्थ्यांना मिळालेले गुण, त्यांनी नोंदवलेले पसंतीक्रम, त्यांच्या पसंतीनुसार उपलब्ध असलेल्या जागा असे विविध घटक पात्रतागुण निश्चित होण्यासाठी कारणीभूत ठरतात, असे सिम्बायोसिस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हृषिकेश सोमण यांनी सांगितले.प्रवेश प्रक्रियेत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. प्रवेश न घेतल्यास संबंधित विद्यार्थी पुढील दोन फेऱ्यांसाठी पात्र राहणार नाही.

# निष्ठावंत शिवसैनिकांनी घेतली बाळासाहेबांची शप्पथ :

# भोसरीत 'मशाल'चेच काम करणार!

## "हातात तुतारी घेणार नाही"! : भोसरी विधानसभा मतदार संघावर उबाठाचा दावा

### उमेदवारीसाठी इच्छुक सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांना बळ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाची ताकद आहे. किंबहुना, या मतदार संघात सेनेला मानणारा मतदार निर्णायक आहे. स्व. बाजीराव लांडे, स्व. गजानन बाबर यांनी या मतदार संघात सेनेचा "आवाज" कायम ठेवला. त्यानंतर सुलभा उबाळे यांनी २००९ आणि २०१४ असे दोन वेळा निवडणूक लढवली. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून "निष्ठावंत शिवसैनिकाला**







पिंपरी । विशेष प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत शिरूर मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासाठी शिवसेना ठाकरे गटाने ताकदीने काम केले. सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांच्या पुढाकारामुळे कोल्हे यांना या मतदार संघात बळ मिळाले. त्यामुळे हा मतदार संघ शिवसेना ठाकरे गटासाठी सोडावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आकुर्डीतील सेनाभवनमध्ये झाली. त्या ठिकाणी शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी पिंपरी आणि भोसरी मतदार संघावर दावा केला. त्यामुळे भोसरीतून 'मशाल' पेटवण्यासाठी आता निष्ठावंतांनीही उठाव केल्याचे चित्र आहे.

शिव आरोग्य सेनेचे शहरप्रमुख दिलीप सावंत म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे आमचे दैवत आहेत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने आम्ही काम करतो. जुन्या काळात स्व. बाजीराव लांडे यांनी शिवसेनेच्या तिकीटावर या भागातून निवडणूक लढवली होती.

माजी खासदार स्व. गजानन बाबर यांनी याच भागातून तिनदा निवडणूक लढवली. हवेली मतदार संघात भोसरीचा समावेश होता. त्यावेळी शिवसेनेच्या चिन्हावर ही निवडणूक लढवली होती. २००९ आणि २००९ मध्ये माजी गटनेत्या सुलभा उबाळे यांनी निवडणूक लढवली होती. त्यामुळे या मतदार संघाचा मूळ शिवसेनेचा आहे. या मतदार संघातून निष्ठावंत शिवसैनिकाला संधी मिळावी. आयात उमेदवार आला, तर त्याने 'मशाल' चिन्हावर लढावे, अन्यथा आम्ही काम करणार नाही.

### उद्धव ठाकरे यांचा आदेश कायम...

भोसरी विधानसभा मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाचे कट्टर शिवसैनिक व निष्ठावंत म्हणून अशोक वाळके, महादेव गव्हाणे, कैलास नेवासकर, अनिल दुरापे, मुकूल शिवले, रामदास फुगे, रत्नमाला सावंत, भास्कर बुर्डे, उज्वला सावंत, जगदाळे आदींचा उल्लेख केला जातो. सुमारे ४० वर्षांपासून ही मंडळी शिवसेनेचे काम करीत आहे. स्व. बाबा धुमाळ यांचा संघटनेच्या विस्तारामध्ये योगदान राहिले आहे. राजकीय वाऱ्याची दिशा ओळखून महाविकास आघाडीच्या तिकीटासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील काही नेते इच्छुक आहेत. पण, सध्या इच्छुक उमेदवार सुलभा उबाळे आणि धनंजय आल्हाट यांच्यासोबत निष्ठावंत शिवसैनिकांची चर्चा झाली आहे. शिंदे गटात तीन-चार पदाधिकारी वगळता अन्य कार्यकर्ते, पदाधिकारी नाहीत. त्यामुळे ठाकरे गटाला भोसरी मतदार संघातून 'मशाल' चिन्हावर उमेदवार मिळावा. उद्धव ठाकरे यांचा आदेश कायम असतो, असेही निष्ठावंतांचे म्हणणे आहे.

---

# 'रेडझोन' साठी एकत्रिकृत विकास नियमावलीत होणार सुधारणा!

## बाधित भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी आमदार लांडगे यांचा पाठपुरावा

### राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नियमावलीत बदलाची मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील देहूरोड डेपो, मॅगझीन डेपोपासून घोषित केलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात (रेडझोन) मध्ये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये सुधारणा करावी. बाधित भूमिपुत्रांना त्यांच्या हक्कांसाठी न्याय मिळावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**




मुंबई येथे महाराष्ट्र राज्य विधिमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणीचे पत्र दिले. त्यावर सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.

आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीलगत देहूरोड दारुगोळा भांडार आणि दिघी मॅगझिन डेपोच्या सीमाभिंतीलगत संरक्षण विभागाने 'रेड झोन' घोषीत केला आहे. रेड झोन प्रभावित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या ट्रान्सफर ऑफ डेव्हलपमेंट राइट्स (TDR) व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची हद्दवाढ होवून १८ गावांची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये दि. १९ ऑगस्ट २००० रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये जुन्या हद्दीच्या विकास योजनेशी समन्वय राखून शहर नियोजन प्रमाणकानुसा विकास योजना तयार केली होती. त्यामध्ये रस्त्यांचे जाळे, आरक्षणे, रहिवास विभाग, औद्योगिक विभाग, वाणिज्य विभाग, शेती विभाग इत्यादी प्रस्तावित होते.

दरम्यान, महापालिका हद्दीलगत संरक्षण विभागाचा देहू रोड येथे ॲम्युनेशन डेपो आहे. त्यापासून २००० यार्डपर्यंत संरक्षण विभागाने प्रतिबंधीत क्षेत्र घोषित केल्याची अधिसूचना दि. २६ डिसेंबर २००२ व दि. २ जून २००४ रोजी शुद्धीपत्रक जाहीर केले आहे. त्यामध्ये मामुर्डी, किवळे, रावेत, निगडी, तळवडे, चिखली या गावांचा समावेश आहे.

तसेच, दिघी मॅगझीन डेपोपासून ११४५ मीटर अंतर दि. १३ सप्टेंबर १९९० रोजी प्रतिबंधित क्षेत्र घोषित केले आहे. त्यामध्ये दिघी, वडमुखवाडी, भोसरी, चऱ्होली ही गावे प्रतिबंधीत क्षेत्राने बाधित होत आहेत. संरक्षण विभागाच्या अधिसूचनेनंतर महानगरपालिकेने प्रतिबंधीत क्षेत्रामधील बांधकाम परवानगी देणे बंद केले आहे. मात्र, प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये मंजूर विकास योजनेमधील रस्ते शहरामधील इतर रस्त्यांशी जोडले असल्यामुळे विकसित करणे आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली आहे.

> मंजूर एकत्रिकृत विकास नियमावलीमधील दुजाभावमुळे प्रतिबंधित (रेड झोन) क्षेत्रातील जमीन मालक- शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. तसेच, प्रतिबंधित क्षेत्रातील रस्ते अद्यापही अविकसित आहेत. वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये रोष आहे. त्यामुळे मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील क्र. ११.२.४ तळटिप (a)(१) मध्ये सुधारणा करुन ५०% ऐवजी १०० % मोबदला देण्याची तरतूद करणे अत्यावश्यक आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील 'रेड झोन' बाधित शेतकरी, नागरिकांच्या हक्कांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून, याबाबत मा. प्रधान सचिव (१) नगरविकास विभाग यांच्याकडे प्रलंबित असलेला पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. त्यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# जागतिक परिषदांचे फलित




**इटली येथे नुकतीच 'जी ७' परिषद पार पडली. या महत्वाच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आमंत्रित होते. त्यानंतर लगेचच युक्रेन युद्धाबाबत स्वित्झर्लंडने पुढाकार घेऊन शांतता परिषद भरविली. या दोन्ही परिषदांत काही महत्त्वाचे निर्णय घेण्याचा प्रयत्न झाला. मात्र, परिषदांतील काही निर्णयांबाबत वाद निर्माण झाले आहेत.**

या सर्व निर्णयांचे पाश्चिमात्य माध्यमांत प्रचंड कौतुक केले गेले. न्याय, कायदा, आंतरराष्ट्रीय संकेत, लोकशाही संकेत, लोकशाही व्यवस्था या सर्वांचा आधार घेऊन 'जी ७'चे निर्णय आणि स्वित्झर्लंडचा पुढाकार कसा कायदेशीर व नैतिक आहे, हे सांगितले जात होते. त्याउलट समाजमाध्यमांत अमेरिकेच्या धोरणांवर टीका सुरू होती. अमेरिकेने व्यापारी; तसेच आर्थिक निर्बंध घालून, डॉलरच्या जागतिक मान्यतेलाच धोका निर्माण केला आहे, हे सांगितले जात होते. आता पाश्चिमात्य वित्तीय संस्थांवर विश्वास ठेवणे अवघड जाईल; कारण अमेरिका ही रशियाच्या पैशांची 'चोरी' करू शकत असेल, तर तो धोका आपल्यालाही आहे, असे बोलले जात आहे. त्याबरोबर 'ब्रिक्स' देश आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी डॉलरला पर्याय शोधत आहेत. 'जी ७', शांतता परिषद, युक्रेन, गाझा यांचा एकत्रित विचार केला, तर दोन गोष्टी जाणवतात. एक म्हणजे, या घडामोडींबाबत माहिती मिळवणे कठीण झाले आहे.



पाश्चिमात्य माध्यमांत आलेली माहिती किती खरी आहे, याविषयी शंका येते. याला समांतर असते समाजमाध्यमांतून मिळणारी माहिती. पूर्व युरोप, रशिया, चीन, आफ्रिका किंवा दक्षिण अमेरिकी वृत्त संस्थांचा मर्यादित प्रसार आहे; यामुळे याला मर्यादा येतात. दुसरी गोष्ट भारताची. एकीकडे रशियाशी पारंपरिक संबंध, तर दुसरीकडे पाश्चिमात्य देशांशी वाढती मैत्री. पूर्वी शीतयुद्धाच्या काळात भारत दोन्ही बाजूंना सांभाळत होता. त्याला आपण अलिप्ततावाद म्हणत होतो. आताही भारत त्याच पद्धतीने दोन्ही बाजू सांभाळत असला, तरी त्यात फरक आहे. आज पाश्चिमात्य देशांना आणि रशियाला भारताची गरज आहे, म्हणून हे देश विरुद्ध जाणार नाहीत. या बदलत्या सामर्थ्याचा फायदा भारत घेत आहे. रशियाविरुद्ध निर्बंध असतानाही त्याच्याशी व्यापार सुरू आहे. इस्रायल व पॅलेस्टाइन या दोन्ही देशांशी संवाद सुरू आहे आणि वेळ पडल्यास युक्रेन समस्येवर निर्णायक भूमिका घेण्याची तयारी आहे. हा बदल समजून घेतला पाहिजे. 'जी ७'च्या बैठकीत हजर राहिलेल्या नेत्यांची राजकीय वाटचाल पाहण्यासारखी आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांना येत्या नोव्हेंबरमध्ये अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कदाचित डोनाल्ड ट्रम्प यांचा सामना करावा लागेल. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना त्यांच्याच पक्षातून विरोध होत असून, जुलैमध्ये त्यांनाही निवडणुकीस सामोरे जायचे आहे. कॅनडाचे जस्टिन ट्रुडो यांनाही त्यांच्याच पक्षाकडून विरोध होतो आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या पक्षाला युरोपीय संघाच्या निवडणुकीत अपयश आले असून, फ्रान्समध्येही निवडणुका जाहीर झाल्या आहेत. जर्मनीत चॅन्सलर ओलाफ शोल्झ यांच्या युक्रेन धोरणाविरुद्ध निदर्शने सुरू आहेत. जपानचे फिमिओ किशिदा हे सर्वांत वाईट पंतप्रधान असल्याचे बोलले जाते. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी नुकत्याच सत्तेवर आल्या आहेत. त्या उजव्या गटाच्या राजकारणाचा पाठपुरावा करतात. 'जी ७'चे अशा प्रकारे अस्थिर किंवा दुबळे वाटणारे नेतृत्व असले, तरी त्यांनी युक्रेनबाबत अत्यंत धाडसी निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या अर्थमंत्री जॅनेट येलेन यांनी युक्रेनला आर्थिक मदत देण्याबाबत महत्त्वाचे वक्तव्य केले. अमेरिका; तसेच युरोपिय युनियनने रशियाची त्या देशांत असलेली वित्तीय गुंतवणूक गोठवली आहे. रशियाला मिळणारे व्याजही गोठविले गेले. जॅनेट येलेन यांच्या मते रशियन गुंतवणूक आणि त्यावर मिळणारे व्याज वित्तीय संस्थांत नुसतेच पडून आहे. या पैशांवर, विशेषत: व्याजावर रशियाचा कोणताही हक्क नाही. ते पैसे या संस्था वापरू शकतात. रशियाच्या मते, असे करणे म्हणजे या संपत्तीची चोरी होते. मात्र, पाश्चिमात्य देशांच्या मते, या पैशांचा वापर युक्रेनमधील युद्धग्रस्त नागरिकांसाठी किंवा युक्रेनच्या संरक्षणासाठी वापरणे हे नैतिक व वैधानिक चौकटीत बसणारे आहे. पाश्चिमात्य देशांच्या या कृत्याचे पडसाद इतरत्र उमटताना दिसतात. युरोप किंवा अमेरिकेतील आपली गुंतवणूक किती सुरक्षित आहे, असा प्रश्न काही देशांना पडू लागला आहे.

## प्रासंगिक »

### 'शहाबानो क्षण'!

***सर्वोच्च न्यायालयाने सारासार विवेकाचे अलीकडे दुर्मीळ होत चाललेले दर्शन घडवले आणि लष्करास या धर्मसेवकांची भरती सुरू करण्याचा आदेश दिला.***

समंजस समाजाने ते स्वीकारणे आवश्यक असते. असे बदल स्वीकारण्यास तयार असलेला समाजच 'समंजस' या विशेषणासाठी पात्र ठरतो. या अशा प्रथा, परंपरा लोकप्रिय असू शकतात आणि जे जे लोकप्रिय ते ते बदलणे त्या त्या राज्यकर्त्यांस मंजूर असेलच असे नाही. अशा वेळी न्यायालयांस पुढाकार घ्यावा लागतो. जनमताची फारशी फिकीर न करता घटना आणि विवेक यांच्या आधारावर उभी असणारी न्याय यंत्रणा ऐतिहासिक प्रथा/परंपरा यांचे कालसापेक्ष मूल्यमापन करून जेव्हा इतिहासास कलाटणी देणारा निर्णय घेते तेव्हा ती न्यायपालिका अभिनंदनास पात्र ठरते. सध्या हा मान इस्रायलच्या सर्वोच्च न्यायालयाचा. यहुदी धर्मीयांचे पवित्र स्थळ असलेला हा देश जन्मास आल्यापासून काही ऐतिहासिक कारणांमुळे सुरू झालेली एक कुप्रथा रद्द करण्याचे धारिष्ट्य या सर्वोच्च न्यायालयाने दाखवले म्हणून हे अभिनंदन.

'नीट' परीक्षा घोटाळा हा मोठाच विश्वासघात आहे यात शंका नाही; पण अशा प्रकारच्या अतिमागणी असलेल्या परीक्षांमध्ये विहीत शिस्तीला फाटा देण्याचा प्रयत्न नेहमीच होत असतो काय, अशी शंका येते! चीनसारख्या तथाकथित 'कडक शिस्तीच्या' देशातील विद्यापीठ- प्रवेश परीक्षा 'गाओकाओ' म्हणून ओळखली जाते.

# राजकारणातून परीक्षांचे केंद्रीकरण...

तिथेसुद्धा गैरप्रकारांच्या कुरबुरी आहेतच. आपल्या परीक्षा व्यवस्थेबद्दलच विश्वास वाटेनासा होण्याचे कारण म्हणजे या घोटाळ्याची गुजरातपासून बिहारपर्यंत पसरलेली व्याप्ती. अन्य परीक्षादेखील 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने घोटाळ्याच्या शक्यतेमुळे रद्द केल्या, ही तर आपल्याकडे एखाददुसरा गैरप्रकार झालेला नसून व्यवस्थाच कुजकी आहे, याची कबुली ठरते. या अनेक परीक्षांना मिळून एकंदर ३० लाख विद्यार्थी बसतात, त्यांपैकी कित्येक लाखांवर मानसिक ताण, आर्थिक ओढाताण आणि शैक्षणिक नुकसान असे तिहेरी संकट यातून कोसळले आहे. सत्ताधाऱ्यांच्या नशिबाने, लोकसभेच्या निवडणुकीनंतर हा घोटाळा उघडकीला येण्याचा प्रसंग ओढवला. नाहीतर सरकारची फारच बदनामी झाली असती. आतादेखील, नव्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच विश्वासार्हतेवर हा कलंक लागला आहे.




झाल्या प्रकारानंतर काही प्रश्न तातडीचे आहेत : फेरपरीक्षा घ्यावी का? परीक्षेसाठी रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या आणि परीक्षा देण्यासाठी दूरच्या केंद्रांवरही जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान नजरेआडच करायचे का? परीक्षा पद्धती सुधारण्यासाठी तात्काळ उपाय कोणते योजणार? फेरपरीक्षांमुळे प्रवेशप्रक्रियाही लांबणार आणि संस्थांचे शैक्षणिक वेळापत्रक कोलमडणार का? – यासारखे प्रश्न. पण या प्रश्नांच्या पलीकडे, आणखी मोठे प्रश्नही आहेत... हे प्रश्न भारतातील संस्था-यंत्रणांच्या संदर्भातले आणि त्यामुळे भारतीय लोकशाहीपुढले प्रश्न आहेत. होय लोकशाहीचाही प्रश्न. भारतीय प्रजासत्ताकाला प्रत्यक्ष व्यवहारात जी अधिमान्यता (लेजिटिमसी) मिळत असते तिचे दोन मुख्य आधार म्हणजे निवडणुका आणि परीक्षा. दोन्हींमध्ये पैशाचा आणि शक्तीचाही खेळ होऊ शकतो, हे खरे. पण समाजातल्या अन्य संस्थांपेक्षा एकंदर व्यवस्थेला दैनंदिन स्वरूपाची अधिमान्यता मिळण्यासाठी या दोहोंचा उपयोग अधिक होतो एवढे निश्चित. 'खुल्या आणि निष्पक्षपाती वातावरणा'ची अपेक्षा निवडणुकीप्रमाणेच परीक्षांबाबतही असते. निवडणुकीतून अथवा परीक्षेतून जी नवी फळी संबंधित संस्थांमध्ये (मग त्या स्थानिक स्वराज्यसंस्था असोत किंवा उच्च शिक्षणाच्या संस्था) येते, तिलाही आपसूक मान्य केले जाते. पण आपल्या परीक्षा पद्धतीमध्ये जे खुले आणि निष्पक्षपाती वातावरण आपल्याला हवे आहे, त्याचा भार अक्षरश: एकट्या परीक्षा यंत्रणेवरच पडतो... याचे कारण मुळात आपल्याकडे शालेय शिक्षणापासून विषमताच सुरू होते, शिक्षणाच्या दर्जात एकवाक्यता नाहीच आणि परीक्षेनंतर नोकरीची खात्री नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गल्लीतील कार्यकर्ते पवारांवर बोलतात!

## अमोल मिटकरींचा महायुतीतील नेत्यांना सवाल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात काही महिन्यामध्ये विधानसभेची निवडणूक जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. तसेच महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला कसा असेल? याबाबत नेत्यांमध्ये सध्या चर्चा सुरु आहेत.**

असे असतानाच महायुतीमध्ये गेल्या काही दिवसांपासून धुसफूस सुरू असल्याची चर्चा आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर महायुतीमध्ये आरोप-प्रत्यारोपाच राजकारण सुरु झालं आहे. आता विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे सर्वांचं लक्ष या अधिवेशनाकडे लागलेलं आहे. हे अधिवेशन येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाचं मानलं जात आहे. असं असतानाच महायुतीमधील नेते एकमेकांवर आरोप करत असल्याचं चित्र आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूरमध्ये एका बैठकीत भाजपाच्या एका कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. तसेच त्यांना महायुतीमधून बाहेर काढण्याची मागणी केली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, आमदार अमोल मिटकरी यांनी थेट भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांना इशारा दिला. ते म्हणाले, “पुण्यात भाजपाचा कोणीतरी एक गल्लीतील कार्यकर्ता अजित पवारांवर बोलला. मग आम्ही हे शांततेने ऐकायचं का?, महायुतीचा धर्म पाळण्याचा ठेका फक्त राष्ट्रवादीने घेतलाय का?”, असं विधान अमोल मिटकरी यांनी केलं. ते टिव्ही ९ मराठीशी बोलत होते.“मी याआधी सांगितलं होतं की, महायुतीमधील तिन्ही पक्षांनी समन्वय साधणं महत्वाचं आहे. आम्ही ज्यावेळी टीका करतो, त्यावेळी अनेकांना वाईट वाटत असेल, तर त्यांनीही थोडसं आपल्या जिभेला आवर घातला पाहिजे. दुसऱ्यांची औकात काढण्यापेक्षा आपलीही औकात पाहीली पाहिजे त्यानंतर बोललं पाहिजे. आमच्या पक्षाकडून आम्हाला नोटीस प्राप्त झाली, असं कळतं आहे.



अद्याप मला मिळाली नाही. मात्र, राष्ट्रवादीलाच राष्ट्रवादीने नोटीस द्यावी, त्यापेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या प्रवक्त्यांना आणि भारतीय जनता पार्टीने त्यांच्या प्रवक्त्यांना नोटीस दिली पाहिजे”, असं अमोल मिटकरी म्हणाले. मिटकरी पुढे म्हणाले, “आमच्या पक्षाला वाटतं की महायुती टिकली पाहिजे. महायुतीमध्ये आम्ही तिन्ही पक्षांनी एकत्र असलं पाहिजे. पण त्यांच्या पक्षाला वाटत नसेल म्हणून ते आवरत नाहीत. आमच्या पक्षाला वाटतं की महायुती टिकली पाहिजे. माझ्या पक्षाने माझ्यावर जबरदस्ती केधीही केली नाही. समज नक्की दिली. मी देखील सांभाळून बोलतो. अन्यथा काहींनी माझी औकात काढल्यानंतर मला तोडीस तोड उत्तर देता येत होतं. फक्त आमच्या प्रदेशाध्यक्षांनी काही प्रोटोकॉल ठेवले. त्यामुळे मी काही बोललो नाही. माझे संस्कार मी सोडले नाहीत. आता पुण्यात कोणीतरी गल्ली बोळातला कार्यकर्ता अजित पवार यांच्यावर बोलून गेला. मग हे आम्ही शांततेने ऐकायचं का?”, असा सवाल अमोल मिटकरी यांनी केला. “कोणीतरी एक कार्यकर्ता अजित पवारांवर बोलला. त्यावेळी त्या ठिकाणी आमदार राहुल कुल होते. त्यांना कळलं नाही का? की महायुतीमधील एका नेत्यांवर आपल्याच पक्षामधील गल्लीतील एक कार्यकर्ता बोलतो आहे. त्याचा विरोध करायला हवा होता. त्यांनी का विरोध केला नाही, हाच माझा प्रश्न आहे. एवढ्या मोठ्या नेत्यांवर कुणीही टीका करतं आणि त्यांना कोणीही बोलत नसेल तर प्रश्न आहे. आता राहुल कुल यांच्यासमोर जे बोलले आहेत. हे दरेकरांना सांगा ना? की महायुतीचा धर्म कोणी पाळावा. महायुतीचा धर्म पाळण्याचा ठेका फक्त राष्ट्रवादीने घेतलाय का? इतर दोन पक्षांनीही प्रोटोकॉल पाळला पाहिजे”,असं अमोल मिटकरी म्हणाले.असे

### महायुती टिकली पाहिजे

“पुण्यात भाजपाचा कोणीतरी एक गल्लीतील कार्यकर्ता अजित पवारांवर बोलला. मग आम्ही हे शांततेने ऐकायचं का?, महायुतीचा धर्म पाळण्याचा ठेका फक्त राष्ट्रवादीने घेतलाय का?”, असं विधान अमोल मिटकरी यांनी केलं. ते टिव्ही ९ मराठीशी बोलत होते.“मी याआधी सांगितलं होतं की, महायुतीमधील तिन्ही पक्षांनी समन्वय साधणं महत्वाचं आहे. आम्ही ज्यावेळी टीका करतो, त्यावेळी अनेकांना वाईट वाटत असेल, तर त्यांनीही थोडसं आपल्या जिभेला आवर घातला पाहिजे. दुसऱ्यांची औकात काढण्यापेक्षा आपलीही औकात पाहीली पाहिजे त्यानंतर बोललं पाहिजे. आमच्या पक्षाकडून आम्हाला नोटीस प्राप्त झाली, असं कळतं आहे. अद्याप मला मिळाली नाही. मात्र, राष्ट्रवादीलाच राष्ट्रवादीने नोटीस द्यावी, त्यापेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या प्रवक्त्यांना आणि भारतीय जनता पार्टीने त्यांच्या प्रवक्त्यांना नोटीस दिली पाहिजे”, असं अमोल मिटकरी म्हणाले. मिटकरी पुढे म्हणाले, “आमच्या पक्षाला वाटतं की महायुती टिकली पाहिजे. महायुतीमध्ये आम्ही तिन्ही पक्षांनी एकत्र असलं पाहिजे. पण त्यांच्या पक्षाला वाटत नसेल म्हणून ते आवरत नाहीत. आमच्या पक्षाला वाटतं की महायुती टिकली पाहिजे. माझ्या पक्षाने माझ्यावर जबरदस्ती केधीही केली नाही.

असतानाच महायुतीमध्ये गेल्या काही दिवसांपासून धुसफूस सुरू असल्याची चर्चा आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर महायुतीमध्ये आरोप-प्रत्यारोपाच राजकारण सुरु झालं आहे. आता विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे सर्वांचं लक्ष या अधिवेशनाकडे लागलेलं आहे. हे अधिवेशन येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाचं मानलं जात आहे. असं असतानाच महायुतीमधील नेते एकमेकांवर आरोप करत असल्याचं चित्र आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूरमध्ये एका बैठकीत भाजपाच्या एका कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. तसेच त्यांना महायुतीमधून बाहेर काढण्याची मागणी केली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, आमदार अमोल मिटकरी यांनी थेट भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांना इशारा दिला.


# उद्धव ठाकरे-देवेंद्र फडणवीस एकाच लिफ्टमध्ये

## राजकीय घडामोडींमुळे राज्यभरात तर्क-वितर्कांना उधाण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू झालं. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे राज्यभरात तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.**

विधिमंडळात उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाच वेळी लिफ्टजवळ आल्यानंतर त्यांनी एकाच लिफ्टमधून वरचा मजला गाठला. मात्र, त्यांच्या या एकत्र केलेल्या ‘प्रवासा’मुळे पुन्हा एकीच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. उद्धव ठाकरे व भाजपा पुन्हा एकत्र येऊ शकतात का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारणा केली असता त्यांनी त्यावर खोचक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे.विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. पहिल्याच दिवशी उद्धव ठाकरेही





विधिमंडळात दाखल झाले. यावेळी देवेंद्र फडणवीस व उद्धव ठाकरे एकाच वेळी लिफ्टजवळ आले. त्यावेळी संवादांची देवाण-घेवाण झाली. त्यानंतर या दोघांनी एकत्रच लिफ्टमधून विधिमंडळाचा वरचा मजला गाठला. या काही मिनिटांच्या ‘सोबती’मध्ये या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली असावी? याविषयी तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. त्यांच्या राजकीय ‘एकी’बाबतही शक्यता वर्तवल्या जात आहेत.दरम्यान, या घटनेबाबत एकनाथ शिंदे यांना माध्यम प्रतिनिधींना विचारणा केली असता त्यांनी त्यावर टोला लगावला. “लिफ्टमध्ये एकत्र गेल्यामुळे काही होईल असं वाटतंय का तुम्हाला? कुणी लिफ्ट मागितली, तरी सहाव्या मजल्यापर्यंत काही ती लिफ्ट पोहोचू शकणार नाही. दोन वर्षांपूर्वी त्यांनी लिफ्ट शिफ्ट केल्यामुळे, म्हणजे ते काँग्रेसच्या लिफ्टमध्ये गेल्यामुळे आम्ही जनतेच्या लिफ्टमध्ये आलो.

### बांद्रा ते बांदा कधी पाहिलंय का त्यांनी?

महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनातलं सरकार आम्ही स्थापन केलं”, असं एकनाथ शिंदे म्हणाले.उद्धव ठाकरे गटाकडून आज लोकसभा निकालांच्या पार्श्वभूमीवर पेढ्यांचं वाटप करण्यात आलं. त्यावरूनही मुख्यमंत्र्यांनी टोला लगावला. “काही लोक बोलतायत, काही लोक वेगळा आनंद साजरा करतायत, काही मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले म्हणून पेढे वाटतायत. भाजपाच्या २४० जागा आल्या, इंडिया आघाडीच्या सगळ्यांच्या मिळूनही तेवढ्या झाल्या नाहीत.

# संसदेत सेंगोल नको, संविधान हवं!

## सपा खासदाराच्या मागणीनंतर विरोधक-सत्ताधाऱ्यांचं ‘महाभारत’

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेतून सेंगोल हटवा अशी लेखी मागणी समाजवादी पक्षाचे खासदार आर. के. चौधरी यांनी केली आहे. त्यांनी या संदर्भात लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहिलं आहे. सेंगोल हटवून त्या ठिकाणी देशाचं संविधान ठेवा अशी मागणीही या पत्रात करण्यात आली आहे. ज्यानंतर भाजपाच्या खासदारांनी टीकेचे बाण चालवले आहेत.**



सेंगोल म्हणजे राजदंड, याचा अर्थ राजाच्या हाती असलेला दंड असाही होतो. पण राजेशाही संपून देश स्वतंत्र झाला आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालं आहे. मग सत्ता राजदंडाप्रमाणे चालणार आहे की संविधानाप्रमाणे? त्यामुळेच माझी मागणी आहे की संसदेतून सेंगोल हटवण्यात यावा आणि त्या ठिकाणी संविधान ठेवण्यात यावं.” मागच्या वर्षी नव्या लोकसभेत सेंगोल ठेवण्यात आला आहे. हा सेंगॉल ब्रिटिशांनी आपल्या देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरुंच्या हाती सोपवला होता. आम्ही आता सत्ता सोडत आहोत तुम्ही ती स्वीकारा हा त्याचा प्रतीकात्मक अर्थ होता. आता हाच सेंगोल हटवण्याची मागणी करण्यात आली आहे.समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी सेंगोलच्या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. “आमच्या खासदाराने ही मागणी केली. याचं कारण संसदेत पहिल्यांदा जेव्हा सेंगोल ठेवण्यात आला तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्या सेंगोलला नमस्कार केला होता. मात्र यावेळी खासदारकीची शपथ घेताना सेंगोलचा नरेंद्र मोदींना विसर पडला.”लालूप्रसाद यादव यांच्या कन्या मीसा भारती यांनीही सेंगोल संसदेतून हटवण्याची मागणी केली. “भारत हा लोकशाही मानणारा देश आहे. सेंगोलल आता संग्रहालयात ठेवला पाहिजे म्हणजे तो संग्रहालयाला भेट देणाऱ्या अभ्यासकांना, पर्यटकांना पाहता येईल.” राजदचे खासदार मनोज झा म्हणाले की, “सेंगोल संसदेतून हटवला पाहिजे. राजांची प्रतीकं, मुद्रा कशाला संसदेत हवीत? त्यापेक्षा संविधानच त्या ठिकाणी ठेवलं गेलं पाहिजे.” काँग्रेसच्या नेत्या रेणुका चौधरी म्हणाल्या, “भाजपाला कधीही दाक्षिणात्य संस्कृती समजणार नाही. तामिळ संस्कृती म्हणजे फक्त सेंगोल नाही. तर त्या संस्कृतीत सर्वाधिक बुद्धिमान लोक आहेत.” बिहारचे भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांनी या प्रकरणी काँग्रेसवर टीका केली आहे. “काँग्रेस सत्तेत येण्यासाठी लोकांची दिशाभूल करत आहे असं त्यांनी म्हटलं आहे.” तर योगी आदित्यनाथ यांनीही यावर टीका केली आहे.आर. के. चौधरी यांनी जे पत्र लिहिलं आणि सेंगोल हटवण्याची मागणी केली त्यानंतर योगी आदित्यनाथ आक्रमक झाले आहेत. “समाजवादी पक्षाने ही मागणी करुन तामिळ संस्कृतीचा अपमान केला आहे. इंडिया आघाडीलाही हा अपमान सहन होतो आहे. कारण संस्कृतीचा अपमान करणं हेच काँग्रेसही करत आलं आहे.” या आशयाची पोस्ट योगी आदित्यनाथ यांनी लिहिली आहे. “सेंगोल हे जर राजसत्तेचं प्रतीक आहे असं सपाचं म्हणणं आहे तर मग पंडीत नेहरुंनी तो सेंगोल ब्रिटिशांकडून कसा काय स्वीकारला? त्यांनी राजेशाहीचं प्रतीक म्हणून तो स्वीकारला का?” असा प्रश्न शेहजाद पूनावाला यांनी उपस्थित केला आहे.चोल साम्राज्यात सत्ता एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे सोपवताना राजदंडाचा म्हणजेच सेंगोलचा वापर केला जायचा. या सेंगोलकडे प्रतीकात्मकतेने राजवट आणि सत्ता म्हणून पाहिले जायचे. नव्याने राज्याभिषेक झालेल्या राजाला हा सेंगोल देऊन न्याय्य तसेच पारदर्शक पद्धतीने राज्यकारभार करावा, असे सांगितले जाई.

### सेंगोलचा थोडक्यात इतिहास

उपलब्ध असलेल्या कागदपत्रांनुसार अथिनाम मठातील दुसऱ्या क्रमांकाचे पुजारी, नादस्वरम वादक राजारथिनाम पिल्लाई, तसेच ओदुवर (गायक) अशा तीन व्यक्तींनी तामिळनाडूमधून हा राजदंड आणला. १४ ऑगस्ट १९४७ रोजी एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये पुजाऱ्यांनी हा राजदंड लॉर्ड माऊंटबॅटन यांना दिला. त्यानंतर तो त्यांच्याकडून परत घेतला. पुढे मोठी मिरवणूक काढून हा राजदंड पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. त्यानंतर हा राजदंड नेहरूंकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी तेथील पुजाऱ्यांनी खास गाणे सादर केले होते. तशी उपलब्ध कागदपत्रांमध्ये नोंद आहे.सेंगोल म्हणजे राजदंड, याचा अर्थ राजाच्या हाती असलेला दंड असाही होतो. पण राजेशाही संपून देश स्वतंत्र झाला आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालं आहे. मग सत्ता राजदंडाप्रमाणे चालणार आहे की संविधानाप्रमाणे? त्यामुळेच माझी मागणी आहे की संसदेतून सेंगोल हटवण्यात यावा आणि त्या ठिकाणी संविधान ठेवण्यात यावं.” मागच्या वर्षी नव्या लोकसभेत सेंगोल ठेवण्यात आला आहे. हा सेंगॉल ब्रिटिशांनी आपल्या देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरुंच्या हाती सोपवला होता. आम्ही आता सत्ता सोडत आहोत

# राष्ट्रपतींच्या अभिभाषणात निवडणूक!

## मोदी सरकारनं केलेल्या विकासकामांच्या उपक्रमांचा आढावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आज देशाच्या संसदेत दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर अभिभाषण झालं. या भाषणात राष्ट्रपतींनी देशाच्या विकासाचा, मोदी सरकारनं केलेल्या विकासकामांचा, राबवलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. त्याचवेळी राष्ट्रपतींनी सीएए, कलम ३७०, नुकत्याच संपलेल्या लोकसभा निवडणुकांचे निकाल, नीट परीक्षा पेपर लीक प्रकरण अशा अनेक मुद्द्यांवरही भाष्य केलं.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा देशात स्थिर सरकार आल्याचं राष्ट्रपतींनी म्हणताच विरोधकांनी मात्र आरडा-ओरडा करत आक्षेप नोंदवला, तर सत्ताधाऱ्यांनी बाकं वाजवून समर्थन दिलं.संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये राष्ट्रपतींचं अभिभाषण झालं. त्यानंतर उपराष्ट्रपतींनीही इंग्रजीत राष्ट्रपतींच्या अभिभाषणातील काही भाग वाचून दाखवला. या अभिभाषणामध्ये नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुका आणि त्यात एनडीएला मिळालेला विजय यावर भाष्य करण्यात आलं. “ही जगातली सर्वात मोठी निवडणूक होती. या निवडणुकीत ६४ कोटी लोकांनी आपलं कर्तव्य बजावलं आहे. महिलांनी मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवला”, असं



राष्ट्रपती भाषणात म्हणाल्या. या निवडणुकीचं सुखद चित्र जम्मू-काश्मीरमध्ये समोर आलं. तिथे मतदानाचे अनेक दशकांचे विक्रम मोडले आहेत. गेल्या ४ दशकांत काश्मीरमध्ये आपण बंद आणि संपामध्येच मतदानाचं चित्र पाहिलं होतं. भारताचे शत्रू या गोष्टीला जागतिक मंचावर जम्मू-काश्मीरचं मत म्हणून पसरवत राहिले. पण यावेळी काश्मीरमधून या दुष्प्रचाराला कडवं उत्तर देण्यात आलं आहे. या निवडणुकीत पहिल्यांदाच घरी जाऊन लोकांकडून मतदान करून घेतलं गेलं. मी लोकसभा निवडणुकीशी संबधित सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते”, असा उल्लेख राष्ट्रपतींनी केला.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीची चर्चा आज पूर्ण जगात होत आहे. जगानं पाहिलं आहे की भारताच्या लोकांनी सलग तिसऱ्यांदा स्थिर आणि स्पष्ट बहुमताचं सरकार बनवलंय.

### अनेक दशकांचे विक्रम मोडले

“या निवडणुकीचं सुखद चित्र जम्मू-काश्मीरमध्ये समोर आलं. तिथे मतदानाचे अनेक दशकांचे विक्रम मोडले आहेत. गेल्या ४ दशकांत काश्मीरमध्ये आपण बंद आणि संपामध्येच मतदानाचं चित्र पाहिलं होतं. भारताचे शत्रू या गोष्टीला जागतिक मंचावर जम्मू-काश्मीरचं मत म्हणून पसरवत राहिले. पण यावेळी काश्मीरमधून या दुष्प्रचाराला कडवं उत्तर देण्यात आलं आहे. या निवडणुकीत पहिल्यांदाच घरी जाऊन लोकांकडून मतदान करून घेतलं गेलं. मी लोकसभा निवडणुकीशी संबधित सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते”, असा उल्लेख राष्ट्रपतींनी केला.

# टायगर श्रॉफचा प्रँक पडला त्याच्यावरच भारी



अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात. त्यात आज १ एप्रिल म्हणजेच 'एप्रिल फूल'. अशातच टायगरने अक्षय कुमारसाठी चांगल्या प्रँकचं नियोजन केलं आणि अक्षयला खूप मोठा 'एप्रिल फूल' केला. या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंकच्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो. अक्षयची एन्ट्री होताच टायगर त्याला ती बाटली उघडून द्यायला सांगतो. बाटली उघडताच कोल्ड ड्रिंकमध्ये जमा झालेला फेस अक्षयच्या तोंडावर उडतो. नंतर अक्षय हसत हसत सगळ्यांवर कोल्ड ड्रिंक उडवतो. या प्रँकला 'एप्रिल फूल'चं गाणं जोडत टायगरनं अक्षयला चांगलंच 'फूल' बनवल्याचं या व्हिडीओत पाहायला मिळतंय. "एप्रिल फूल बडे मियाँ" असं कॅप्शन या व्हिडीओला टायगरनं दिलं आहे. टायगर आणि अक्षयचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत आपल्या प्रतिक्रिया शेअर केल्या आहेत. 'खिलाडीबरोबरच खिलवाड', 'छोटे मियाँनं बदला घेतला' अशा अनेक कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत. दरम्यान, 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं, तर हा चित्रपट ईदच्या मुहूर्तावर म्हणजेच १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात.या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंक्च्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो.

# आलियाच्यात पळवले होते रणबीरचे शूज

रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली. या दोघांच्या लग्नाला फक्त जवळचे नातेवाईक उपस्थित होते. लग्न समारंभातील प्रथेनुसार वधूच्या बहिणी नवऱ्या मुलाच्या चपला किंवा शूज पळवतात व त्यानंतर भेटवस्तू मागतात. रणबीरच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी शूज पळवल्यावर अभिनेत्याने त्याच्या मेव्हणीला ११ ते १२ कोटी रुपये दिले होते अशा चर्चा तेव्हा सर्वत्र रंगल्या होत्या. याबाबत रणबीरने कपिल शर्माच्या शोमध्ये खुलासा केला आहे. रणबीर कपूर, त्याची आई नीतू व बहीण रिद्धिमा यांनी नुकतीच 'द ग्रेट इंडियन कपिल शो' या कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. यावेळी कपिलने रणबीरला लग्नात या शूज पळवण्याच्या विधीबद्दल विचारलं.कपिल म्हणाला, "आम्ही असं ऐकलंय की, तुमच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी तुझे शूज चोरले होते आणि ते परत घेण्यासाठी तू मेव्हणीला ११ ते १२ कोटी दिलेस हे खरं आहे का?" यावर रणबीर म्हणाला, "आलियाच्या कोणत्याही बहिणीने माझ्याकडे एवढे कोटी रुपये वगैरे मागितले नाहीत. त्यांनी शूज चोरल्यावर काही लाखांची मागणी केली होती. पण, मी त्यांच्याबरोबर बार्गेनिंग करून त्यांना काही हजारांवर आणलं आणि तेवढेच पैसे मी त्यांना दिले होते." "आमचं लग्न तसंही घरच्या घरी झालं होतं. त्यामुळे जरी त्यांनी मला शूज दिले नसते, तरीही ते घरीच राहिले असते. मी पण घरी असाच राहिलो असतो." असं मजेशीर उत्तर रणबीर कपूरने दिलं. दरम्यान, आलिया भट्ट व रणबीर कपूर आता सुखी वैवाहिक आयुष्य जगत आहेत. २०२२ च्या एप्रिलमध्ये लग्नगाठ बांधल्यावर ६ नोव्हेंबर २०२२ रोजी अभिनेत्रीने गोंडस लेकीला जन्म दिला. या जोडप्याची लेक राहा सुद्धा आता सोशल मीडियावर चांगलीच लोकप्रिय झाली आहे. लवकरच ही जोडी 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाच्या दुसऱ्या भागात एकत्र झळकणार आहे. रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली.



# पूजा रोहन ला करतेय डेट?

अभिनेत्री पूजा हेगडेने बॉलीवूड आणि दाक्षिणात्य इंडस्ट्रीमधून जगभरात आपली ओळख निर्माण केली. आपल्या व्यावसायिक आयुष्याबाबत जेवढी ती उघडपणे बोलते तितकंच आपलं वैयक्तिक आयुष्य तिला खासगी ठेवायला आवडतं. अशातच पूजा हेगडे तिच्या कथित बॉयफ्रेंड रोहन मेहराबरोबर पुन्हा एकदा दिसली. वांद्रे येथे एकत्र फिरताना पापाराझींनी त्यांचे फोटोज काढले, त्या वेळेस दोघंही एकाच कारमध्ये होते. यावेळी पूजानं सफेद रंगाचा शर्ट, ग्रे ट्राउजर व काळे बूट घातले होते; तर रोहननं काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळी पॅन्ट व सफेद शूज, असा कॅज्युअल लूक केला होता. पूजा हेगडे गेल्या काही दिवसांपासून रोहनला डेट करीत असल्याची चर्चा सुरू आहे. रोहन दिवंगत अभिनेते विनोद मेहरा यांचा मुलगा आहे. रोहननं २०१८ मध्ये सैफ अली खानबरोबर 'बाजार' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. रोहनचं नाव याआधी तारा सुतारियाबरोबर जोडलं गेलं होतं. तथापि, मे २०१९ मध्ये दोघे विभक्त झाल्याची माहिती समोर येऊ लागली.2023 मध्ये पूजा एका क्रिकेटरला डेट करत आहे आणि लवकरच ती त्याच्याशी लग्न करणार आहे अशा चर्चांना उधाण आलं होतं. तथापि, 'द फ्री प्रेस जर्नल'नं दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्रीनं या अफवा खोडून काढल्या आणि जाहीर केलं की, त्या खोट्या आहेत.दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर पूजा सलमान खानबरोबर 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटामध्ये शेवटची दिसली होती. फरहाद सामजी दिग्दर्शित या चित्रपटात व्यंकटेश दग्गुबती, जगपती बाबू, भूमिका चावला, विजेंदर सिंग, अभिमन्यू सिंग, राघव जुयाल, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल, शहनाज गिल, पलक तिवारी व विनाली भटनागर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जिजाजींना नाही आणलं का?

अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थबरोबर साखरपुडा केला आहे. साखरपुड्यानंतर पहिल्यांदाच शनिवारी ती मुंबई विमानतळावर दिसली. सिद्धार्थशी साखरपुडा केल्यानंतर पहिल्यांदाच ती सार्वजनिक ठिकाणी दिसली. अदितीने एअरपोर्ट लूकसाठी डेनिम शर्टसह लेयर्ड को-ऑर्डर सेट घातला होता. ती खूप छान दिसत होती. यावेळी एका पापाराझीने तिला सिद्धार्थबद्दल विचारलं. त्यावर अदिती लाजताना दिसली. अदितीला पापाराझीने सिद्धार्थबद्दल विचारलं. "सरांना नाही आणलं का? माफ करा, जिजाजींना नाही आणलं का?" असं विचारल्यावर अदिती लाजत हसू लागली. नंतर तिने सांगितलं की सिद्धार्थ तिच्याबरोबर आला नसून कामानिमित्त दुसरीकडे गेला आहे.



# अंकिताच्या लग्नात अमृताने लक्ष वेधून घेतलं

रणदीप हुड्डा दिग्दर्शित 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट आता प्रेक्षकांना मराठीत पाहता येणार आहे. या चित्रपटाच्या मराठी प्रीमियरला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. यामध्ये रणदीप हुड्डासह अभिनेत्री अंकिता लोखंडे प्रमुख भूमिकेत झळकली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई सावरकर यांची भूमिका अंकिताने साकारली आहे. या चित्रपटाच्या मराठी स्क्रिनिंगला



अमृता खानविलकरने देखील खास उपस्थिती लावली होती. अंकिता आणि अमृता या दोघीही गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकींच्या घट्ट मैत्रिणी आहेत. अमृता याआधी लाडक्या मैत्रिणीला पाठिंबा देण्यासाठी 'बिग बॉस'च्या घरात देखील पोहोचली होती. याशिवाय अंकिताच्या लग्नात सुद्धा अमृताने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाच्या नुकत्याच पार पडलेल्या प्रीमियर शोला सुद्धा तिने हजेरी लावली होती.चित्रपट पाहिल्यावर अमृताने रणदीपसह अंकिताचं कौतुक करण्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्री लिहिते, ""स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट मराठीत पाहण्याची संधी मिळाली. रणदीप सरांचं अभिनय कौशल्य अद्भुत आहे.

# द्रविडने निराश विराटला दिला धीर!

## इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रीस टोपलीने वि राटला केले आऊट

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयसीसी टूर्नामेंटचा रेकॉर्ड धारक विराट कोहली २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कपच्या सेमीफायनलमध्येही फ्लॉप ठरला. भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील शानदार सामन्यात सर्वांच्या नजरा कोहलीवर खिळल्या होत्या. पण विराट क्लीन बोल्ड झाला. यानंतर तो खूपच निराश असल्याचा दिसला. या स्पर्धेतील ७ सामन्यांमध्ये विराटने दुहेरी आकडाही पार न करण्याची ही चौथी वेळ आहे. उपांत्य फेरीत विकेट गमावल्यानंतर विराट ड्रेसिंग रूममध्ये निराश दिसत होता, त्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने त्याला धीर दिला. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्याचबरोबर चाहते राहुल द्रविडचे कौतुक करत आहेत.**




टी-२० वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियामध्ये एक मोठा प्रयोग करण्यात आला. विराट कोहलीच्या फलंदाजीचा क्रमांक बदलण्यात आला आणि त्याला सलामीला पाठवले जात आहे. सलामीवीर म्हणून विराट कोहली पूर्णपणे फ्लॉप दिसत आहे. विराट दोन वेळा शून्यावर बाद झाला होता, तर त्याने ७ सामन्यांत केवळ दोन वेळा दुहेरी अंकात धावा केल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत कोहलीने अवघ्या ९ धावांत आपली विकेट गमावली. या सामन्यातील तिसऱ्या षटकात त्याला रीस टोपलीने क्लीन बोल्ड केले. क्लीन बोल्ड झाल्यानंतर विराट खूप निराश दिसत होता. मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने ड्रेसिंग रूममध्ये त्याचे सांत्वन केले. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.इंग्लंड संघाने गेल्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत टीम इंडियाचा पराभव केला होता. या वेळी भारताला मागील पराभवाचा बदला घेण्याची सुवर्णसंधी आहे. विशेष म्हणजे विराटच्या विकेटनंतर युवा पंतलाही दुहेरी आकडा पार करण्यात यश आले नाही. मात्र, यानंतर रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी आक्रमक फलंदाजी करत भारतीय संघाचा डाव सावरला. ज्यामुळे टीम इंडियाला ८ षटकात ६५ धावांपर्यंत मजल मारता आली.टी-२० विश्वचषक २०२४ चा दुसरा उपांत्य सामना भारत आणि इंग्लंड संघांमध्ये गयाना येथील प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजी करत आहे. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने या सामन्यात चांगली सुरुवात केली आहे. या सामन्याच्या सुरुवातीलाच रोहित शर्माने एक मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे. भारतीय कर्णधारांच्या खास यादीत त्याने आपले स्थान निर्माण केले आहे.इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीतील सामना ८ षटकांनंतर पावसामुळे थांबवण्यात आला आहे. भारताने ८ षटकांत २ बाद ६५ धावा केल्या आहेत. तत्पूर्वी टीम इंडियाने पॉवरप्लेमध्ये २ विकेट्स गमावले. विराट कोहली ९ धावा तर ऋषभ पंत ४ धावा करत बाद झाले. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा मात्र आपल्या फॉर्ममध्ये परतला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ धावा करून आपला दबदबा निर्माण करणारा रोहित इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यातही जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. रोहितने आतापर्यंत २६ चेंडूत ६ चौकार मारत ३७ धावा केल्या आहेत. यासह त्याने मोठी कामगिरी केली आहे.रोहित शर्माने कर्णधार म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. यासह तो भारताच्या दिग्गज कर्णधारांच्या यादीत सामील झाला आहे. सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय कर्णधारांच्या यादीत रोहित पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. या यादीत विराट कोहलीचे नाव अग्रस्थानी आहे. कोहलीने भारतीय कर्णधार म्हणून १२,८८३ धावा केल्या आहेत.

### रोहित जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत

तर एमएस धोनी दुसऱ्या स्थानावर आहे. धोनीने ११,२०७ धावा केल्या. मोहम्मद अझरुद्दीन ८०९५ धावांसह तिसऱ्या स्थानावर तर सौरव गांगुली ७६४३ धावांसह चौथ्या स्थानावर आहे. आता या यादीत रोहित शर्माचेही नाव जोडले गेले आहे.रोहित शर्माने टी-२० वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रमही केला आहे. या यादीत त्याने महेला जयवर्धनेला मागे टाकले आहे. महेला जयवर्धनेने टी-२० विश्वचषकात १११ चौकार मारले होते. पण रोहित शर्मा आता त्याच्याही पुढे गेला आहे.इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा मात्र आपल्या फॉर्ममध्ये परतला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ धावा करून आपला दबदबा निर्माण करणारा रोहित इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यातही जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे.

# कपिल देवचा टीम इंडियाला महत्त्वाचा सल्ला!

## इंडियाला 1983 च्या वर्ल्ड कपच्या गेम प्लॅनबद्दल सांगितले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाला आज उपांत्य फेरीत इंग्लंडचा सामना करायचा आहे. आज जिंकणारा संघ विजेतेपदासाठी अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे. गेल्या १० वर्षांपासून, आयसीसी स्पर्धांमध्ये बाद फेरी गाठल्यानंतर भारताला विजेतेपद मिळवण्यात वारंवार अपयश आले आहे.**




अशा परिस्थितीत भारताचे पहिले विश्वचषक विजेता कर्णधार कपिल देव यांनी गुरुवारी टीम इंडियाला एक सल्ला दिला आहे. ते म्हणाला की, रोहित शर्मा आणि कंपनी वेस्ट इंडिजमध्ये होणारा टी-२० विश्वचषक जिंकू शकेल की नाही हे ठरवण्यात वैयक्तिक नसून सामूहिक कामगिरी महत्त्वाची भूमिका बजावेल.कपिल देव यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले की, “आपण फक्त रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्या किंवा कुलदीप यादव यांच्याबद्दलच का बोलावे? प्रत्येकाची भूमिका आहे. स्पर्धा जिंकणे हे त्यांचे काम आहे. त्यामुळे सामना जिंकण्यासाठी कोणत्याही एका खेळाडूची कामगिरी महत्त्वाची ठरू शकते, परंतु स्पर्धा जिंकण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे. आपण फक्त बुमराह किंवा अर्शदीपवर अवलंबून राहिलो तर आम्हाला विजयाची नोंद करणे कठीण होईल.”कपिल देव १९८३ चा गेम प्लॅन सांगताना म्हणाले, “आपण संघाबद्दल बोलले पाहिजे. हे तुम्हाला कोणत्याही एका खेळाडूपेक्षा चांगला दृष्टीकोन देते. एक प्रमुख खेळाडू असू शकतो पण विश्वचषक जिंकण्यासाठी प्रत्येकाला योगदान द्यावे लागेल.” कपिल देव पुढे म्हणाले, “१९८३ च्या विश्वचषक विजेत्या संघात कामगिरी करणारा ते एकमेव खेळाडू नव्हतेपरफॉर्मन्स दिला. तुम्ही एका खेळाडूवर अवलंबून राहण्यास सुरुवात केल्यास, याचा अर्थ असा की तुम्ही स्पर्धा अधिक वेळा जिंकू शकणार नाही.”

### टीम इंडियाला दिल्या शुभेच्छा

इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी कपिल देव यांनी भारताला शुभेच्छा दिल्या आणि संघ ट्रॉफी जिंकेल अशी आशा व्यक्त केली. भारताचा हा माजी कर्णधार म्हणाला, “संघाला माझ्या शुभेच्छा. मला आशा आहे की भारतीय खेळाडू जसे खेळत आहेत, तसेच खेळ करत राहतील. असे घडू नये की त्यांचा दिवस खराब आहे आणि ते स्पर्धेबाहेर आहेत (जसे गेल्या वेळी ५० षटकांच्या विश्वचषकात घडले होते). त्यांना सलाम. मी टीम इंडियाला शुभेच्छा देतो आणि त्याच्या आनंदासाठी प्रार्थना करतो.आज जिंकणारा संघ विजेतेपदासाठी अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे. गेल्या १० वर्षांपासून, आयसीसी स्पर्धांमध्ये बाद फेरी गाठल्यानंतर भारताला विजेतेपद मिळवण्यात वारंवार अपयश आले आहे.